# धुळे महानगरपालिका

**जाहिरात**

**भरतीप्रक्रियेबाबत तसेच महानगरपालिकेशी संबंधित अपडेटस् थेट आपल्या मोबाईलवर मिळवण्यासाठी खालील सोशल मिडीया माध्यमांवर धुळे महानगरपालिकेला फॉलो करावे.**

**फेसबुक**

https://www.facebook.com/DhuleM.Corporation/

**इंस्टाग्राम**

https://www.instagram.com/dhule_municipal_corporation

**X (Formerly Twitter)**

https://x.com/Dmc_dhule

**व्हॉटस्अॅप**

https://whatsapp.com/channel/००२९VbCTU७kICVfmhXjz८i०q

## सविस्तर जाहिरात खालीलप्रमाणे

धुळे महानगरपालिका अंतर्गत वैद्यकीय आरोग्य विभागामध्ये विविध संवर्गातील पदांवर कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर मुलाखतीव्दारे नेमणूक करावयाची आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे पदे ०६ महिन्याच्या कालावधीसाठी करार तत्वावर भरण्याकरिता दिनांक – १०/०३/२०२६ रोजी मुलाखत आयोजित करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | पदनाम | प्रवर्ग | एकूण पदसंख्या | एकत्रित मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (Medical Officer) | अजा -२, विजाअ-१, भजब-१, भजक-१, इमाव-३, SEBC-१, EWS-१, खुला-३ | १३ | रु.६०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | पशु शल्य चिकित्सक<br>(Veterinary Surgeon) | खुला | १ | रु.६०,०००/- |
| ३ | पशु वैद्यकीय अधिकारी<br>(Veterinary Medical Officer) | खुला | १ | रु.४०,०००/- |
| ४ | वैद्यकशास्त्र तज्ञ<br>Medical expert | खुला | १ | रु.६०,०००/- |
| ५ | बधिरीकरण तज्ञ<br>(Anesthesiologist) | खुला | १ | रु.६०,०००/- |
| ६ | बालरोग तज्ञ<br>(Pediatrician) | खुला | १ | रु.६०,०००/- |
| ७ | स्त्रीरोग तज्ञ<br>(Gynecologist) | खुला | १ | रु.६०,०००/- |
| ८ | विकृतीशास्त्र तज्ञ<br>(Pathologist) | खुला | १ | रु.६०,०००/- |

**शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी<br>(Medical Officer) | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यक शास्त्रातील सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी किंवा M.B.B.S परीक्षा उत्तीर्ण., शासकीय निम शासकीय ३ वर्षाचा अनुभव, मेडीकल कौन्सीलचा परवाना<br>ब) शासन केंद्र शासन निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील प्रभाग वैद्यकीय अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ५ वर्षांचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक.<br>क) रुग्णालयातील प्रशासन, सार्वजनिक आरोगय व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषतः स्वच्छता पर्यवेक्षण, साथ आजार निर्मूलन कार्यक्रम हिवताप नियंत्रण आदि बाबींच्या कार्याचा किमान ५ वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव धारण करणा-या उमेदवारांस प्राधान्य. |
| २ | पशु शल्य चिकित्सक<br>(Veterinary Surgeon) | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पशुवैद्यकीय शास्त्राची पदवी<br>ब) पशुवैद्यकीय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी अथवा स्थानिक स्वराज्य संस्थाशी निगडीत कामाचा ३ वर्षाच्या अनुभवास प्राधान्य |
| ३ | पशु वैद्यकीय अधिकारी<br>(Veterinary Medical Officer) | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पशुवैद्यकीय शास्त्राची पदवी<br>ब) पशुवैद्यकीय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी अथवा स्थानिक स्वराज्य संस्थाशी निगडीत कामाचा २ वर्षाच्या अनुभवास प्राधान्य |
| ४ | वैद्यकशास्त्र तज्ञ<br>Medical expert | अ) मान्यताप्राप्त विदयापीठाची एम.डी. (मेडीसीन) पदवी.<br>ब) शासकीय/निमशासकीय/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाचा अनुभव. |
| ५ | बधिरीकरण तज्ञ<br>(Anesthesiologist) | अ) मान्यताप्राप्त विदयापीठाची एम.डी. (ऍनास्थेशिया) किंवा एम.बी.बी.एस पदवी आणि डी.ए. (डिप्लोमा इन ऍनास्थेशिया)<br>ब) शासकीय/निमशासकीय/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाचा अनुभव. |
| ६ | बालरोग तज्ञ<br>(Pediatrician) | अ) मान्यताप्राप्त विदयापीठाची एम.डी.डी.सी.एच./एम.डी (बालरोग चिकित्सशास्त्र)<br>ब) शासकीय/निमशासकीय/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाचा अनुभव. |

| | | |
|---|---|---|
| ७ | स्त्रीरोग तज्ञ (Gynecologist) | अ) मान्यताप्राप्त विदयापीठाची एम.डी. (स्त्री व प्रसुतीशास्त्र) किंवा एम.बी.बी.एस. डी.जी. ओ.<br>ब) शासकीय/निमशासकीय/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाचा अनुभव. |
| ८ | विकृतीशास्त्र तज्ञ (Pathologist) | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.डी. (शरीरशास्त्र) किंवा एम.बी.बी.एस. डी.सी.पी. (Diploma in Clinical Pathology) व डी.सी.पी. (Diploma in Clinical Pathology) नंतरचा शरीर विकृतीशास्त्र विषयातील किमान ०५ वर्षांचा अनुभव किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रूग्णालयातील प्रयोगशाळेतील कामाचा ३ वर्षांचा अनुभवास प्राधान्य. |

**वयोमर्यादा**

खुला प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व आरक्षित प्रवर्गासाठी शासन निर्णयानुसार शिथिलक्षम राहील.

**निवड**

१. कंत्राटी पदांची निवड महानगरपालिका स्तरीय निवड समितीच्या अखत्यारीत राहील.
२. आयुक्त किंवा आयुक्त पदनिर्देशित करतील ते अधिकारी समिती अध्यक्ष असतील.
३. मुलाखतीच्या दिवशी अर्ज स्विकारले जातील त्यानंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येईल.
४. प्रवर्गातील उमेदवार प्राप्त न झाल्यास सदर आरक्षित प्रवर्गातील पदावर सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार भरावयाचे अधिकार आयुक्त यांना राहील.
५. विहीत अनुभव धारण करणारे उमेदवार उपलब्ध न झाल्यास अनुभवाची अट शिथिल करण्याचा अधिकार समितीला राहील.
६. वैद्यकीय अधिकारी (कंत्राटी) या पदासाठी मुलाखतीच्या दिवशी एम.बी.बी.एस. अर्हताधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास बी.ए.एम.एस. अर्हताधारक उमेदवारांना कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती देण्याचे अधिकार समितीस राहीतील.
७. अंतिम निर्णय हा समिती अध्यक्ष व आयुक्त यांचा राहील.

**गुणांकन पध्दत**

| विवरण | गुणांकन पद्धत | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying Examination (अंतिम वर्ष गुण) | उमेदवाराच्या अंतिम वर्षाच्या टक्केवारीनुसार Proportion काढण्यात येईल. सूत्र: (प्राप्त टक्केवारी × १००) ÷ १०० = प्रत्यक्ष टक्केवारीप्रमाणे गुण. उदा. ७२% = ७२ गुण | १०० |
| अनुभव (Experience) | शासन / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था अनुभव – प्रति पूर्ण वर्ष १० गुण. खाजगी अनुभव – प्रति पूर्ण वर्ष ५ गुण. अपूर्ण वर्ष ग्राह्य धरले जाणार नाही. | ५० |
| थेट मुलाखत (Interview) | खालील निकषांवर गुणांकन करण्यात येईल:<br>a) Subject Knowledge १०<br>b) Research & Academic Knowledge १०<br>c) Leadership Quality १०<br>d) Administrative Abilities १०<br>e) Communication Skills & Personality १० | ५० |

| | एकुण गुण | २०० |
|---|---|---|

**खालीलप्रमाणे अटी व शर्तीवर नियुक्ती करण्यात येईल**

१. सदर पदाची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल, त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून दर्जा असणार नाही.

२. सदर नेमणुका करार पध्दतीने प्रथमतः ०६ महिन्यांसाठी करण्यात येईल ०६ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत केलेल्या कामकाजाचे गुणवत्तेचा, कामाचा अनुभव व कामाची निकट याबाबत आढावा घेवून वेळोवेळी वाढविता येईल. तथापी, अशी मुदत वाढविताना एकावेळी ही मुदत ०६ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही याची काळजो नियुक्ती प्राधिकारी घेईल अशा मुदतबाढ कमाल ३ वेळा असेल. त्यानंतर उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास, त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस नव्याने सामोरे जावे लागेल.

३. संबधित नियुक्ती प्राधिकारी महानगरपालिकेच्या वतीने नियुक्तीच्या वेळी संबधितां बरोबर विहीत प्रपत्रात करार करतील कराराचे विहीत प्रपत्र "परिशिष्ट अ" मध्ये देण्यात आले आहे कराराची सर्व कागदपत्रे जतन करुन ठेवणे ही संबंधीत कार्यालयाची जबाबदारी असेल.

४. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी / कर्मचा-यांना एकत्रित मानधन व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाही.

५. शासन व महानगरपालिका वेळोवेळी सुधारीत करेल अश्या अटी व शर्ती लागू राहतील

६. प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी करुन धुळे महानगरपालिका, धुळे येथील नोटीस बोर्डावर व वेबसाईटवर पात्र/अपात्र उमेदवाराची यादी वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

७. सदर कंत्राटी नियुक्ती नंतर कायम सेवेत सामावून घेणेबाबत मे.न्यायालयात अथवा इतर सक्षम प्राधिकारणाकडे दाद मागता येणार नाही.

८. नियुक्ती प्राधिकारी यांना आपल्या नियुक्तीबाबत व कामकाजाबाबत शंका / तक्रार / हरकत प्राप्त झाल्यास आपली नियुक्ती संपूष्टात आणण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील.

**आवश्यक दस्तऐवज**

१. विहीत नमुन्यातील अर्ज.

२. आधार कार्ड. (स्वयं साक्षांकित)

३. अर्हतेचा पुरावा. (स्वयं साक्षांकित)

४. महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र.

५. अनुभव प्रमाणपत्र.

६. जन्म तारखेचा पुरावा.

७. पासपोर्ट साईज फोटो (रंगीत, २ प्रती)

८. आरक्षित प्रवर्गात अर्ज सादर करणाऱ्यांना सक्षम प्राधिकारणाचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**अर्ज सादर करण्याची प्रक्रीया**

१. उमेदवाराने https://dhulecorporation.org या वेबासाईटवरुन अर्जाचा नमूद डाऊनलोड करुन. हार्डकॉपी मध्ये अर्ज भरुन आवश्यक त्या संपूर्ण कागदपत्रासह मुलाखतीच्या दिवशी भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह धुळे महानगरपालिका येथे सकाळी ठिक १०.०० वा समक्ष उपस्थित रहावे. (अन्य मार्गाने पाठविलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाही).

मुलाखतीचे ठिकाण :- आयुक्त यांचे दालन, दुसरा मजला, नविन प्रशासकीय इमारत, धुळे महानगरपालिका

**खालील प्रकाराचे अर्ज सदोष गणले जातील व त्यांचा विचार करण्यात येणार नाही. -**

१. विहीत पात्रता धारण न करणारे.
२. मजकूर चुकीचा किंवा अपूर्ण भरलेले अर्ज
३. स्वाक्षरी नसलेले अर्ज
४. ओळखपत्र म्हणून आधार कार्डची स्वसाक्षांकीत छायांकीत प्रत नसलेला अर्ज
५. एकदा नाकारण्यात आलेल्या अर्जाबाबत पुर्नविचार केला जाणार नाही. त्यासंबंधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल धुळे महानगरपालिका कार्यालयाकडून घेतली जाणार नाही.
६. उमेदवाराचे छायाचित्र (फोटो) साक्षांकित केलेले नसल्यास.
७. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांच्या / प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती नसलेले अर्ज.
८. विहीत नमुन्यात सादर न केलेले अर्ज.

विहीत किमान अर्हता धारण करणा-या पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात व वरील आवश्यक त्वा कागदपत्रांसह अर्ज मागविण्यात येत असून, अर्जदार हा पात्र असल्यास त्यांनी धुळे महानगरपालिका नविन प्रशासकिय इमारत येथे दिनांक १०/०३/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा अर्ज पडताळणी व मुलाखतीस उपस्थित रहावे.

अर्जाचा नमूना https://dhulecorporation.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर नमुना Download करून त्या नमुन्यात अर्ज करण्यात यावा.

**(मा.आयुक्त सो यांच्या मान्यतेने)**

**करुणा डहाळे**
**अतिरिक्त आयुक्त**
**धुळे महानगरपालिका**

## पदनिहाय कर्तव्ये व कामकाज

१. **वैद्यकीय अधिकारी**

वैद्यकीय अधिकारी यांनी महानगरपालिकेच्या दवाखान्यात बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवा देणे, रुग्णांचे योग्य निदान व उपचार करणे, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध व नियंत्रण करणे, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, लसीकरण मोहिमा व आरोग्य शिबिरांचे नियोजन व पर्यवेक्षण करणे, साथरोग नियंत्रण उपाययोजना राबविणे, रुग्णालयीन प्रशासन व स्वच्छता व्यवस्थापन पाहणे, आवश्यक वैद्यकीय नोंदी व अहवाल सादर करणे तसेच आयुक्त किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सोपविलेली इतर आरोग्यविषयक व प्रशासकीय कामे पार पाडणे अपेक्षित राहील.

२. **पशु शल्य चिकित्सक**

पशु शल्य चिकित्सक यांनी भटकी व पाळीव जनावरांवर आवश्यक शस्त्रक्रिया करणे, जखमी व आजारी जनावरांचे उपचार करणे, जनावरांचे बधिरीकरण कार्यक्रम राबविणे, रेबीज व इतर झुनोटिक आजारांवर नियंत्रणासाठी उपाययोजना करणे, पशुसंवर्धन व रोगप्रतिबंधक मार्गदर्शन करणे, संबंधित नोंदी व अहवाल ठेवणे तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेली कामे पार पाडणे अपेक्षित राहील.

३. **पशु वैद्यकीय अधिकारी**

पशु वैद्यकीय अधिकारी यांनी जनावरांची तपासणी व उपचार करणे, लसीकरण व रोगनियंत्रण कार्यक्रम राबविणे, भटकी जनावरे नियंत्रण मोहिमेत सहभाग घेणे, पशुसंवर्धन व आरोग्यविषयक जनजागृती करणे, संबंधित शासकीय योजनांची अंमलबजावणी करणे तसेच आवश्यक अहवाल व नोंदी ठेवणे अपेक्षित राहील.

४. **वैद्यकशास्त्र तज्ञ (MD Medicine)**

वैद्यकशास्त्र तज्ञ यांनी औषधोपचार संबंधित गुंतागुंतीच्या रुग्णांचे निदान व उपचार करणे, दीर्घकालीन आजारांचे व्यवस्थापन करणे, वैद्यकीय अधिकाऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे, विशेष आरोग्य शिबिरे व तपासणी मोहिमा राबविणे, आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक वैद्यकीय सेवा पुरविणे, आवश्यक वैद्यकीय अहवाल सादर करणे तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सोपविलेली कामे पार पाडणे अपेक्षित राहील.

५. **बधिरीकरण तज्ञ (भूल तज्ञ / Anaesthetist)**

बधिरीकरण तज्ञ यांनी शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णांची तपासणी करून भूल देणे, शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णाच्या जीवनचिन्हांचे निरीक्षण करणे, भूल व्यवस्थापन सुरक्षितरीत्या पार पाडणे, शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची स्थिती स्थिर ठेवणे, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित वैद्यकीय हस्तक्षेप करणे, ऑपरेशन थिएटरमधील मानक कार्यपद्धतींचे पालन सुनिश्चित करणे तसेच संबंधित नोंदी व अहवाल ठेवणे अपेक्षित राहील.

६. **बालरोग तज्ञ**

बालरोग तज्ञ यांनी बालकांची तपासणी, निदान व उपचार करणे, नवजात शिशु सेवा पुरविणे, लसीकरण कार्यक्रम राबविणे, कुपोषण प्रतिबंधक उपाययोजना करणे, पालकांना आरोग्यविषयक समुपदेशन देणे, बाल मृत्यू कमी करण्यासाठी कार्यक्रम राबविणे तसेच आवश्यक अहवाल व नोंदी ठेवणे अपेक्षित राहील.

७. **स्त्रीरोग तज्ञ**

स्त्रीरोग तज्ञ यांनी महिलांची तपासणी व उपचार करणे, गर्भवती महिलांची प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर तपासणी करणे, सुरक्षित प्रसूती सेवा पुरविणे, आवश्यक शस्त्रक्रिया करणे, कुटुंब नियोजन सेवा पुरविणे, मातामृत्यू प्रतिबंध कार्यक्रमात सहभाग घेणे तसेच संबंधित वैद्यकीय नोंदी व अहवाल ठेवणे अपेक्षित राहील.

८. **विकृतीशास्त्र तज्ञ (Pathologist)**

विकृतीशास्त्र तज्ञ यांनी प्रयोगशाळा विभागाचे तांत्रिक पर्यवेक्षण करणे, रक्त, लघवी, मल, कफ, बायोप्सी, साइटोलॉजी व हिस्टोपॅथोलॉजी नमुन्यांची तपासणी करून रोगनिदान अहवाल देणे, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांच्या निदानास सहाय्य करणे, प्रयोगशाळेतील गुणवत्ता नियंत्रण प्रणाली राबविणे, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियमांचे पालन करणे, न्यायवैद्यकीय प्रकरणांमध्ये आवश्यक अहवाल देणे तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सोपविलेली कामे पार पाडणे अपेक्षित राहील.

- **सामान्य अट (सर्व पदांसाठी लागू):**

आयुक्त / वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेली इतर प्रशासकीय व आरोग्यविषयक कामे पार पाडणे बंधनकारक राहील.

## अर्जाचा नमुना

**प्रति,**

**मा. आयुक्त सो.**
धुळे महानगरपालिका, धुळे
धुळे, पिन ४२४ ००१.

| उमेदवाराचा अलीकडच्या काळातील रंगीत पासपोर्ट फोटो |
|---|

विषय :- ------------------------------------------------ या पदासाठी अर्ज

संदर्भ :- दिनांक ---------------------------- रोजीची जाहिरात

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय जाहिरातीनुसार मी मनपा कार्यालयातील -------------------------------- या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

| **अ क्र** | **तपशील** | **माहिती** | | |
|---|---|---|---|---|
| १. | संपूर्ण नाव :- | आडनाव | स्वत:चे नाव | वडील / पतीचे नाव |
| २. | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- | | | |
| ३. | ई मेल आयडी :- | | मो. नं. :- | |
| ४. | जन्म तारीख | | | |
| ५. | लिंग | पुरुष | स्त्री | |
| ६. | सदयस्थितीत महानगरपालिकेत कामकाज करीत आहे काय ? | | होय | नाही |
| | होय असल्यास | कार्यालयाचे नाव :- | | पदनाम :- |
| ७. | जात :- | जातीचा प्रवर्ग :- | | |

| | SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | OBC | SBC | EWS | SEBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८. | शैक्षणिक अर्हतेचा तपशील :- | | | | |
| ९. | शैक्षणिक अर्हता | बोर्ड / विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले एकुण गुण | टक्केवारी |
| A) | | | | | |
| B) | | | | | |
| C) | | | | | |
| D) | | | | | |
| १०. | इतर तांत्रिक व उच्च शै. अर्हता | | | | |
| ११. | कामाचा अनुभव :- | | | | |

| | अ.क्र. | संस्थेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | १ | | | |
| | २ | | | |

सदरची पदे ही तात्पुरत्या / मानधन स्वरुपातील नेमणुकीची आहेत याची मला जाणीव असून मी असेही प्रमाणीत करतो / करीते की, वर दिलेली माहिती खोटी / चुकीची किंवा अपुरी असल्याचे आढळून आल्यास नेमणुकीच्या कोणत्याही टप्प्यावर या माहितीच्या आधारे महापालिका सेवेतून मला कमी करण्यास तसेच या भरती करीताच्या अपात्रतेस मी स्वत: जबाबदार राहिल. याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई देखील केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**स्थळ :-** **अर्जदाराची सही**

**दिनांक :-** **अर्जदाराचे नाव** ------------------------------

**सहपत्रे :- अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.**

१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्रे २) जन्म तारखेचा पुरावा ३) अनुभवाची प्रमाणपत्रे ४) जात प्रमाणपत्र ५) इतर आवश्यक कागदपत्रे